**<u>निवडसूची सन २०१४-१५</u>**
**शहर लिपिक संवर्गातील “वरिष्ठ स्वीय सहायक, गट-अ” या पदावर पदोन्नती.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन आदेश क्र: रापोसे-१११४/प्र.क्र.२९१/पोल-१अ,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- ५ जानेवारी, २०१६.

**<u>संदर्भ :</u>**- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/८/६८०/व.स्वी.स. (१४-१५)/२५२/२०१४, दि.३.१०.२०१५.

**<u>शासन आदेश</u> :-**

पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयातील “शहर लिपिक” या संवर्गातील “वरिष्ठ स्वीय सहायक, गट-अ” या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या, सन २०१४-१५ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या, श्री. राजेंद्र नरेश गौड, स्वीय सहायक, गट-ब (राजपत्रित) यांना वरिष्ठ स्वीय सहायक, गट-अ या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अधिकाऱ्यास पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत, महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. श्री. गौड यांच्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती होणारी शिक्षा, ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. सदर पदोन्नतीवरील नेमणूक, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ आणि याचिका क्र. ४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. तसेच, सदर पदोन्नतीवरील नेमणूक, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

५. पदोन्नतीवर पदस्थापना देते समयी, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन श्री. गौड यांना पदोन्नतीवर पदस्थापना देण्यात यावी.

६. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६०१०४१७०२२९५९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2016.01.05 13:02:49 +05'30'

**( चारुशीला तांबेकर )**
सह सचिव, गृह विभाग.

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

**प्रतिलिपी :-**

१) महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९) सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१२), मंत्रालय, मुंबई,
१०) संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
११) निवडनस्ती (कार्या. पोल-१अ).